PlanetRead
Literacy for a Billion

Movie: Kichak Vadh
Year: 1959

Song: Asa Nesun Shalu Hirva
Lyricist: G. D. Madgulkar

धिन् धिन् तान न ना
हो...
असा नेसून शालू हिरवा
असा नेसून शालू हिरवा
आली वेणी तू खोचून मरवा
जासी कुणीकडे जासी कुणीकडे
कुणाकडे सखे सांग ना
का गं बघतेस मागे पुढे

हो...
का रे वाटेत गाठून पुसशी
का रे वाटेत गाठून पुसशी
का रे निलाजऱ्या तू हसशी
जाते सख्याकडे
जाते सख्याकडे प्रियाकडे
तुला सांगते
त्याची माझी रे प्रीत जडे

तू गं परी गोरी गोरी
चाफ्यावाणी सुकुमारी
दुपारचं पार ऊन जळते गं
वर ऊन जळते
टकमक बघू नको
जाऊ नको तिच्या वाटे
का रे उठाठेव तिला कळते रे
तिचे तिला कळते

हो...
का गं आला असा फणकारा
का गं आला असा फणकारा
कंगणाचा करीत झणकारा
जासी कुणीकडे जासी कुणीकडे
कुणाकडे सखे सांग ना
का गं बघतेस मागे पुढे

दूर डोंगरी घुमते बासुरी
चैत बहरला वनामधी रे वनामधी
पदर फडफडत ऊन थरथरत
प्रीत उजळते मनामधी बघ मनामधी
हो...
मी भल्या घरातील युवती
मी भल्या घरातील युवती
लोकं फिरतात अवतीभवती
जाते सख्याकडे
जाते सख्याकडे प्रियाकडे
खरं सांगते
म्हणून बघते मी मागे पुढे
जासी कुणीकडे
सख्याकडे
कुणीकडे
सख्याकडे
कुणाकडे
प्रियाकडे

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*